# चिपळूण तालुका वैश्य नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, चिपळूण

## – एकोणतिसावी वार्षिक अधिमंडळ सभेची नोटीस –

(फक्त भागधारक सभासदांसाठी)

माननीय सभासद,

चिपळूण तालुका वैश्य नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, चिपळूण या संस्थेची एकोणतिसावी वार्षिक अधिमंडळ सभा रविवार दि. २६/०९/२०२१ रोजी सायंकाळी ठीक ४.०० वा. प्रधान कार्यालय, इंद्रप्रस्थ अपार्टमेंट, परकार कॉम्प्लेक्स समोर, खेंड, चिपळूण येथून महाराष्ट्र शासन, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय विस्तार इमारत, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई–४०००३२ यांच्याकडील परिपत्रक संकीर्ण २०२१/प्र. क्र. २४/१३–स दिनांक ३०/०७/२०२१ नुसार सदर सभा झूम ॲपद्वारे खालील विषयांचा विचारविनिमय करण्यासाठी आयोजित करण्यात आली आहे. तरी सर्व सभासदांनी खाली दिलेल्या लिंकद्वारे सभेच्या कामकाजात सहभागी व्हावे ही विनंती.

## - सभेपुढील विषय -

१) मागील वार्षिक दि. १४/०३/२०२१ रोजीच्या अधिमंडळ सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) दिनांक ३१/०३/२०२१ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षातील संचालकांनी स्विकारलेला ताळेबंद, नफा–तोटा पत्रक मंजूर करणे.

३) सन २०२०–२१ साली झालेल्या व संचालक मंडळाने शिफारस केलेल्या नफा वाटणीस मान्यता देणे व लाभांश जाहीर करणे.

४) सन २०२०–२१ या आर्थिक वर्षाच्या शासकीय तपासणी अहवालाचे वाचन करणे. (अहवाल प्राप्त झाल्यास)

५) सन २०२१–२२ चे मा. संचालक मंडळाने मंजूर केलेले अंदाजपत्रक स्विकारणे.

६) सन २०२१–२२ या आर्थिक वर्षातील लेखापरीक्षक नेमणुकीबाबत विचार करणे.

७) क्रियाशील तसेच अक्रियाशील सभासदांसंबंधी निकष पुर्ततेची माहिती सादर करणे.

८) संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईक यांच्या कर्जाबाबत तपशीलवार माहिती देणे.

९) माननीय अध्यक्ष महाशय यांच्या परवानगीने मान्यवर सभासदांकडून आलेल्या सूचना, शिफारशींचा विचार करणे.

१०) मा. अध्यक्ष महाशय यांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या कामांचा विचार करणे.

स्थळ – चिपळूण
दिनांक – ०१/०९/२०२१

संचालक मंडळाचे आदेशावरून

**श्री. निनाद गिरीधर देवळेकर**
व्यवस्थापक

**श्री. मिलिंद मधुकर कापडी**
व्हा. चेअरमन